भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७

(सन १९६७ चा अधिनियम क्रमांक ३७)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

# The Unlawful Activities (Prevention) Act, 1967

**(Act No. 37 of 1967)**

[As in force on the 28th February 1994]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९४

**[किंमत : रु. २.४० पैसे]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथा विद्यमान असलेला अनलॉफूल ॲक्टिव्हिटीज (प्रिव्हेंशन) ॲक्ट, १९६७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५, अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठ २१ ते २८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक २३ जून १९९४.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Unlawful Activities (Prevention) Act, 1967 as on the 28th February, 1994 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June, 1994 on pages 21 to 28.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative test of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 23rd June, 1994.

# बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७

## विशोधन अधिनियमांची सूची

१. १९६९ चा अधिनियम, २४.

२. १९७२ चा अधिनियम, ३१.

# बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७

कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण १ ले

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव आणि विस्तार.

२. व्याख्या.

२ क. जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या कायद्यासंबंधीच्या निर्देशांचा अन्वयार्थ.

प्रकरण २ रे

बेकायदेशीर संघटना

३. एखादी संघटना बेकायदेशीर म्हणून घोषित करणे.

४. अधिकरणाकडे निर्णयार्थ निर्देशित करणे.

५. अधिकरण.

६. अधिसूचनेच्या प्रवर्तनाचा कालावधी व ती रद्द करणे.

७. बेकायदेशीर संघटनेच्या पैशांच्या वापरास मनाई करण्याची शक्ती.

८. बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरण्यात आलेल्या जागा अधिसूचित करण्याची शक्ती.

९. या अधिनियमाखालील अर्जांचा निकाल करताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

प्रकरण ३ रे

अपराध आणि शिक्षा

१०. बेकायदेशीर संघटनेचे सदस्य असल्याबद्दल शिक्षा.

११. बेकायदेशीर संघटनेच्या निधीचा व्यवहार करण्याबद्दल शिक्षा.

१२. अधिसूचित जागेच्या संबंधात काढलेल्या आदेशाच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

१३. बेकायदेशीर कृत्यांबद्दल शिक्षा.

१४. अपराध दखलपात्र असणे.

प्रकरण ४ थे

संकीर्ण

१५. संघटना चालू राहणे.

१६. अधिकारितेस प्रतिबंध.

१७. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल खटला.

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१९. प्रत्यायोजनाची शक्ती.

२०. अन्य अधिनियमितींशी विसंगत असलेला अधिनियम आणि नियम, इत्यादींचा परिणाम.

२१. नियम करण्याची शक्ती.

# बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७

(सन १९६७ चा अधिनियम क्रमांक ३७)

[ २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान ]  [ ३० डिसेंबर १९६७ ]

**माणसे आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक परिणामकारक रीत्या प्रतिबंध करण्याकरिता आणि त्या कृत्यांशी निगडित असलेल्या बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

प्रकरण १ ले

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव आणि विस्तार.

[1][ (२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे :

[2][ परंतु, केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात येईल. ] ].

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "संघटना" याचा अर्थ, माणसांचा कोणताही संघात किंवा निकाय, असा आहे ;

(ख) "भारताच्या राज्यक्षेत्राचा एखादा भाग परस्वाधीन करणे" यात, अन्य कोणत्याही परकीय देशाने अशा भागावर सांगितलेल्या हक्क मान्य करणे हे सुद्धा समाविष्ट आहे ;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(घ) "भारताच्या राज्यक्षेत्राचा एखादा भाग संघराज्यातून फुटून निघणे" यामध्ये, असा कोणताही भाग भारताच्या राज्यक्षेत्राचा भाग म्हणून राहील किंवा कसे हे ठरवण्याचा स्वतःला हक्क असल्याचे निक्षून प्रतिपादन करणे हे देखील समाविष्ट आहे;

(ङ) "अधिकरण" याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित करण्यात आलेले अधिकरण, असा आहे ;

(च) "बेकायदेशीर कृत्य" याचा अर्थ, एखादा माणूस किंवा संघटना यांच्या संबंधातील अशा व्यक्तीने किंवा संघटनेने केलेली जी कोणतीही कारवाई (मग ती प्रत्यक्ष कृती करून केलेली असो या लेखी, तोंडी किंवा दृष्य प्रतिदर्शनाद्वारे किंवा अन्य प्रकारने केलेली असो),—

(एक) कोणत्याही कारणावरून भारताच्या राज्यक्षेत्राचा एखादा भाग परस्वाधीन व्हावा किंवा भारतच्या राज्यक्षेत्राचा एखादा भाग संघराज्यातून फुटून बाहेर पडावा या उद्देशाने केलेली असते किंवा अशा कोणत्याही दाव्यास पाठिंबा देते अथवा याप्रमाणे तो भाग परस्वाधीन होण्याची किंवा फुटून बाहेर पडण्याची घटना घडवून आणण्यास कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला चिथावणी देते;

(दोन) भारताची सार्वभौमता व प्रादेशिक एकात्मता नाकारते किंवा प्रश्नास्पद करते, तिला तडे पाडते किंवा तिला तडे पाडण्याच्या उद्देशाने केलेली असते,—
अशी कारवाई, असा आहे ;

[3][ (छ) "बेकायदेशीर संघटना" याचा अर्थ, —

(एक) कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणे हे जिचे उद्दिष्ट आहे किंवा कोणतेही बेकायदेशीर कृत्य आरंभिण्यास किंवा त्यामध्ये सहभागी होण्यास जी व्यक्तींना उद्युक्त करते किंवा मदत करते किंवा जिचे सदस्य असे कृत्य आरंभतात ; किंवा

---

१. १९६९ चा अधिनियम २४, कलम २ द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले.

२. जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात आल्याचा दिनांक १ सप्टेंबर १९६९. पहा सामान्य सांविधिक नियम, २०९८, दिनांक ३० ऑगस्ट, १९६९ भारताचे राजपत्र (इंग्रजी), भाग दोन, अनुभाग ३ (एक), पृ. ६१५.

३. १९६९ चा अधिनियम २४, कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

एच ४२३३—२(१०२१—११-९४)

(दोन) भारतीय दंड संहिता यातील कलम १५३ क किंवा कलम १५३ ख अन्वये दंडनीय असलेले कोणतेही कृत्य करणे हे जिचे उद्दिष्ट आहे किंवा असे कोणतेही कृत्य आरंभिण्यास किंवा त्यामध्ये सहभागी होण्यास जी व्यक्तींना उद्युक्त करते किंवा मदत करते किंवा जिचे सदस्य असे कोणतेही कृत्य आरंभतात,—— १८६० चा ५५.

अशी कोणतीही संघटना असा आहे :

परंतु, उपखंड (दोन मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट जम्मू व काश्मीर राज्याला लागू होणार नाही.]

जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या कायद्यासंबंधीच्या निर्देशाचा अन्वयार्थ. [1][२ क. जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या एखाद्या कायद्यासंबंधी या अधिनियमात जो कोणताही निर्देश असेल त्या निर्देशाचा त्या राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात जर कोणताही तदनुरूप कायदा अंमलात असेल तर त्या कायद्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.]

## प्रकरण २ रे

## बेकायदेशीर संघटना

एखादी संघटना बेकायदेशीर म्हणून घोषित करणे. ३. (१) एखादी संघटना ही बेकायदेशीर संघटना आहे किंवा झालेली आहे असे जर केंद्र शासनास वाटत असेल तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनद्वारे अशा संघटनेला बेकायदेशीर म्हणून घोषित करू शकेल.

(२) अशा प्रत्येक अधिसूचनेत, ती ज्या कारणावरून काढण्यात आली ती कारणे आणि केंद्र शासनाला आवश्यक वाटेल असा इतर तपशील विनिर्दिष्ट करण्यात येईल :

परंतु, जी वस्तुस्थिती प्रकट करणे लोकहिताच्या विरुद्ध आहे असे केंद्र शासनाला वाटेल, ती वस्तु-स्थिती प्रकट करणे केंद्र शासनास या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे भाग पडणार नाही.

(३) अशा अधिसूचनेत करण्यात आलेली घोषणा ही, अधिकारणाने कलम ४ अन्वये एखादा आदेश काढून त्याद्वारे कायम केल्याखेरीज, आणि असा आदेश शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केल्याखेरीज ती कोणतीही अधिसूचना परिणामक होणार नाही :

परंतु, एखादी संघटना बेकायदेशीर म्हणून तातडीने घोषित करणे आवश्यक आहे असे जर केंद्र शासनाचे मत झाले तर, त्याची कारणे लेखी नमूद करून, केंद्र शासन, अशी अधिसूचना ज्या दिनांकाला शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात आली असेल, त्या दिनांकापासून कलम ४ अन्वये काढण्यात येईल अशा कोणत्याही आदेशाच्या अधीनतेने लागू होईल असा निदेश देऊ शकेल.

(४) अशी प्रत्येक अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्याशिवाय आणखी ती बाधित संघटनेचे एखादे प्रधान कार्यालय असल्यास ते जेथे असेल त्या राज्यात खप असलेल्या कमीत कमी एका दैनिक वृत्तपत्रामध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येईल, आणि केंद्र शासनास योग्य वाटेल अशा पद्धतीने ती अशा संघटनेवरही बजावण्यात येईल ; अशी बजावणी करताना पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही पद्धतीचा अवलंब केला जाईल, त्या अशा :——

(क) संघटनेचे कोणतेही कार्यालय असल्यास त्या कार्यालयातील एखाद्या ठळक ठिकाणी अधिसूचनेची एक प्रत चिटकवून ; किंवा

(ख) संघटनेचे कोणतेही प्रमुख पदाधिकारी असतील तर त्या पदाधिकाऱ्यांकडे शक्य झाल्यास अधिसूचनेची एक प्रत पाठवून ; किंवा

(ग) सर्वसाधारणपणे ज्या क्षेत्रात संघटनेचे कार्य चालते त्या क्षेत्रात दवंडी पिटवून किंवा ध्वनिक्षेपकाद्वारे अधिसूचनेतील मजकूर जाहीर करून ; किंवा

(घ) विहित करण्यात येईल अशा अन्य पद्धतीने.

---

१. १९७२ चा अधिनियम ३१, कलम ४ द्वारे घातले.

अधिकरणाकडे निर्णयार्थ निर्देशित करणे.

४. (१) कलम ३ चे पोटकलम (१) याअन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे एखादी संघटना बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आली असेल त्या बाबतीत, ती बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यासाठी पुरेसे कारण आहे किंवा नाही याचा निर्णय करण्याकरिता केंद्र शासन, उक्त पोटकलमाखाली अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, ती अधिसूचना अधिकरणाकडे निर्देशित करील.

(२) पोटकलम (१) अन्वये केलेला निर्देश मिळाल्यानंतर, अधिकरण बाधित संघटनेवर, लेखी नोटीस बजावून ती संघटना बेकायदेशीर म्हणून का घोषित करण्यात येऊ नये यासंबंधीचे कारण, अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखवण्यास तीद्वारे फर्मावील.

(३) संघटनेने किंवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा सदस्यांनी कोणतेही कारण दाखवले असल्यास ते कारण विचारात घेतल्यानंतर, अधिकरण कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने चौकशी करील आणि केंद्र शासन किंवा संघटनेचे पदाधिकारी अथवा सदस्य यांच्याकडून स्वतःला आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती मागवून नंतर अधिकरण त्या संघटनेस बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यासाठी पुरेसे कारण आहे किंवा नाही याचा निर्णय करील व शक्य तितक्या त्वरेने आणि कोणत्याही परिस्थितीत कलम ३, पोटकलम (१) अन्वये ज्या दिनांकाला अधिसूचना काढण्यात आली होती त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अधिसूचनेत, केलेली घोषणा कायम करणारा किंवा रद्द करणारा असा आदेश काढील.

(४) पोटकलम (३) अन्वये काढण्यात आलेला अधिकरणाचा आदेश शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

अधिकरण.

५. (१) आवश्यक झाल्यास व होईल तेव्हा केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे "बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिकरण" या नावाने ओळखले जाणारे असे एका व्यक्तीचे अधिकरण घटित करू शकेल व ती व्यक्ती केंद्र शासनाने नियुक्त करावयाची असेल :

परंतु, कोणतीही व्यक्ती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असल्याखेरीज ती याप्रमाणे नियुक्त केली जाणार नाही.

(२) कोणत्याही कारणाने अधिकरणाच्या पीठासीन अधिकाऱ्यांचे पद (तात्पुरती अनुपस्थिती खेरीजकरून अन्यथा) रिक्त झाले तर, केंद्र शासन ते रिक्त पद भरण्यासाठी या कलमाच्या उपबंधानुसार अन्य व्यक्तीला नियुक्त करील आणि अधिकरणासमोरील कार्यवाही ही ज्या टप्प्याला ते रिक्त पद भरले गेले त्या टप्प्यापासून पुढे चालू करता येईल.

(३) केंद्र शासन अधिकरणाला या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देईल.

(४) अधिकरणाच्या संबंधात आलेला सर्व खर्च भारताच्या एकत्रित निधीतून भागवण्यात येईल.

(५) कलम ९ च्या उपबंधाच्या अधीनतेने, अधिकरणाला आपली कामे पार पाडताना त्यातून उद्‌भवणाऱ्या सर्व बाबींच्या संबंधात, आपल्या बैठकी कोणत्या जागेत किंवा जागांमध्ये घ्यावयाच्या यांसह आपल्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याची शक्ती असेल.

१९०८ चा ५. (६) दाव्याची संपरीक्षा करणाऱ्या दिवाणी न्यायालयाकडे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याखाली ज्या शक्ती निहित केल्या आहेत त्याच शक्ती या अधिनियमाखालील चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ अधिकरणाला पुढील बाबींच्या संबंधात असतील, त्या बाबी म्हणजे,—

(क) कोणत्याही साक्षीदारास समन्स काढून बोलावणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) पुरावा म्हणून सादर करण्याजोगा कोणताही दस्तऐवज किंवा अन्य मूर्त वस्तू प्रकट व हजर करणे ;

(ग) प्रतिज्ञालेखावर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख मागवणे;

(ङ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी कोणतेही आयोगपत्र काढणे.

(७) अधिकरणासमोरील कोणतीही कार्यवाही ही भारतीय दंड संहिता याची कलमे १९३ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि अधिकरण हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, यांचे कलम १९५ व प्रकरण ३५ वे यांच्या प्रयोजनार्थ दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५. १८९८ चा ५.

अधिसूचनेच्या प्रवर्तीचा कालावधी व ती रद्द करणे.

६. (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, कलम ३ अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना, जर तिच्यामध्ये केलेली घोषणा अधिकरणाने कलम ४ खाली आदेश काढून त्याद्वारे कायम केली तर, ज्या दिनांकास ती अधिसूचना परिणामक होते त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत अंमलात राहील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासन कलम ३ अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना कोणत्याही वेळी स्वतः होऊन किंवा तीमुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून रद्द करून शकेल—मग त्या अधिसूचनेत करण्यात आलेली घोषणा अधिकरणाने कायम केलेली असो वा नसो.

बेकायदेशीर संघटनेच्या पैशांच्या वापरास मनाई करण्याची शक्ती.

७. (१) जर एखादी संघटना कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या आणि त्याच कलमाच्या पोटकलम (३) अन्वये परिणामक झालेल्या अधिसूचनेद्वारे बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आलेली असेल आणि अशा बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरले जाणारे किंवा वापरावयाच्या उद्देशाने ठेवलेले कोणतेही पैसे, रोखे किंवा पतरकमा एखाद्या व्यक्तीच्या अभिरक्षेत आहेत अशी केंद्र शासनाची, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर खात्री झाली असेल तर केंद्र शासन, त्या बाबतीत लेखी आदेश काढून त्याद्वारे अशा व्यक्तीस, असे पैसे, रोखे किंवा पतरकमा अथवा आदेश काढल्यानंतर तिच्या अभिरक्षेत येतील ते अन्य पैसे, रोखे किंवा पतरकमा, केंद्र शासनाच्या लेखी आदेशानुसार असेल ते खेरीज-करून अन्यथा प्रदान करण्यास, सुपूर्द करण्यास, हस्तांतरित करण्यास किंवा त्यांच्या संबंधात अन्य कोणत्याही पद्धतीने व्यवहार करण्यास मनाई करू शकेल आणि अशा आदेशाची एक प्रत ज्या व्यक्तीला अशा प्रकारे मनाई करण्यात आलेली आहे त्या व्यक्तीवर पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने बजावण्यात येईल.

(२) केंद्र शासन पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या मनाई आदेशाची एक प्रत अन्वेषणासाठी ते शासन स्वतःच निवडील अशा त्याच्या राजपत्रित अधिकाऱ्याच्या नावे पृष्ठांकित करील आणि अशा आदेशाची प्रत हीच वॉरंट म्हणून असेल व त्यांच्या आधारे असा अधिकारी, ज्या व्यक्तीला अनुलक्षून आदेश देण्यात आलेला आहे त्या व्यक्तीच्या जागेत किंवा जागेवर प्रवेश करून अशा व्यक्तींच्या चोपडया तपासून शकेल, पैसे, रोखे किंवा पतरकमा यासाठी त्या जागेची झडती घेऊ शकेल आणि पैसे, रोखे अथवा पतरकमा बेकायदेशीर संघटनेसाठी वापरण्यात येत आहेत किंवा वापरण्याच्या उद्देशाने ठेवण्यात आल्या आहेत असा त्या अन्वेषण अधिकाऱ्यास संशय असेल अशा कोणत्याही पैशांच्या, रोख्यांच्या किंवा पतरकमांच्या कोणत्याही व्यवहाराचे मूळ कशात आहे, त्यासंबंधी अशा कोणत्याही व्यक्तीकडे किंवा त्या व्यक्तीने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे, अभिकर्त्याकडे किंवा सेवकाकडे चौकशी करू शकेल.

(३) या कलमान्वये काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत ही समन्स बजावणीसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८, यामध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने बजावण्यात येईल, किंवा, ज्या व्यक्तीवर ती बजावयाची ती व्यक्ती म्हणजे एखादा निगम, कंपनी, बँक किंवा अन्य संघटना असेल तर तिचा कोणताही सचिव, संचालक किंवा त्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेला अन्य अधिकारी किंवा व्यक्ती यांच्याकडे पाठवून अथवा निगम, कंपनी, बँक किंवा अन्य संघटना यांच्या नोंदलेल्या कार्यालयात किंवा अशा प्रकारचे कार्यालय नसेल त्या बाबतीत, ज्या ठिकाणी अशा संस्थेचा धंदा चालतो त्या ठिकाणी देऊन किंवा डाकेने पाठवून बजावण्यात येईल. १८९८ चा ५.

(४) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या मनाई आदेशामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती, ती ज्या जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक मर्यादांच्या आत स्वेच्छेने राहते किंवा धंदा करते किंवा प्राप्तीसाठी स्वतः काम करते त्या न्यायालयाकडे ज्यांच्या संबंधात मनाई आदेश काढण्यात आलेला आहे ते पैसे, रोखे किंवा पतरकमा बेकायदेशीर संघटनेसाठी वापरण्यात येत नाहीत किंवा तसा वापर करण्याच्या उद्देशाने त्या ठेवण्यात आलेल्या नाहीत हे सिद्ध करण्यासाठी असा आदेश बजावण्यात आल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अर्ज करून शकेल आणि जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय त्या प्रश्नासंबंधी निर्णय देईल.

(५) पोटकलम (२) अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही अन्वेषणाच्या ओघात मिळविलेल्या कोणत्याही माहितीची या कलमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडून केंद्र शासनाच्या संमतीशिवाय वाच्यता केली जाणार नाही.

(६) या कलमातील "रोखे" या शब्दात, ज्यायोगे एखादी व्यक्ती तिच्यावर एखादी रक्कम देण्याचे कायदेशीर दायित्व असल्याचे कबूल करते असा किंवा ज्याअन्वये एखाद्या व्यक्तीला एखादी रक्कम मिळण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होतो असा दस्तऐवज अंतर्भूत आहे.

चा ४५.
चा ५.

८. (१) कलम ३ अन्वये काढण्यात आलेली जी अधिसूचना त्याच कलमाच्या पोटकलम (३) अन्वये परिणामक झाली आहे अशा अधिसूचनेद्वारे एखादी संघटना बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आली असेल त्या बाबतीत, केंद्र शासन, जी जागा अशा बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरली गेली आहे असे त्याचे मत असेल अशी कोणतीही जागा शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करू शकेल.

बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरण्यात आलेल्या जागा अधिसूचित करण्याची शक्ती

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "जागा" यामध्ये एखादे घर, इमारत किंवा त्याचा एखादा भाग, किंवा एखादा तंबू अथवा जलयान यांचा समावेश होतो.

(२) पोटकलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, ज्याच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक मर्यादांच्या आत अशी अधिसूचित जागा आहे तो जिल्हा दंडाधिकारी किंवा त्याने यासंबंधात लेखी प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी अधिसूचित जागेत आढळलेल्या (वापरावयाचे कपडे, स्वयंपाकाची भांडीकुंडी, अंथरुणे-पांघरुणे, कारागिरांची हत्यारे, शेतीची अवजारे, गुरेढोरे, धान्य आणि अन्नसामग्री व त्याला क्षुल्लक स्वरूपाच्या वाटतील त्या वस्तू खेरीजकरून इतर) सर्व जंगम संपत्तीची दोन प्रतिष्ठित साक्षीदारांच्या समक्ष एक यादी करील.

(३) जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या मते जर अशा यादीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तू बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येत असतील किंवा वापरता येण्यासारख्या असतील, तर जिल्हा दंडाधिकारी, त्याच्या स्वतःच्या लेखी आदेशानुसार असेल ते खेरीजकरून अन्यथा कोणत्याही व्यक्तीस त्या वस्तू वापरण्यास मनाई करणारा आदेश काढू शकेल.

(४) त्यानंतर जिल्हा दंडाधिकारी, जी कोणतीही व्यक्ती अधिसूचनेच्या दिनांकाला अधिसूचित जागेत राहत नव्हती त्या व्यक्तीला जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश करता येणार नाही अथवा त्या जागेवर किंवा जागेत थांबून राहता येणार नाही असा आदेश काढू शकेल :

परंतु, जी व्यक्ती अधिसूचनेच्या दिनांकाला अधिसूचित जागेत राहत होती अशा कोणत्याही व्यक्तीच्या निकटच्या नातेवाईकाला या पोटकलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(५) ज्या बाबतीत पोटकलम (४) अनुसार एखाद्या व्यक्तीला अधिसूचित जागेत प्रवेश करण्याची अथवा त्या जागेवर किंवा जागेत थांबण्याची परवानगी देण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीला, अशा परवानगीनुसार वागत असताना, जिल्हा दंडाधिकारी तिच्या वागणुकीचे विनियमन करण्यासाठी जे आदेश देईल त्यांचे अनुपालन करावे लागेल.

:९८ चा ५.

(६) फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, किंवा केंद्र शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती अधिसूचित जागेत प्रवेश करणाऱ्या किंवा प्रवेश करू पाहणाऱ्या, किंवा त्या जागेवर अथवा जागेत थांबून राहिलेल्या कोणत्याही व्यक्तीची झडती घेऊ शकेल, तसेच झडती घेण्याच्या प्रयोजनार्थ तिला अडकवून ठेवू शकेल :

परंतु, या पोटकलमानुसार कोणत्याही स्त्रीची झडती, स्त्रीखेरीज अन्य कोणालाही घेता येणार नाही.

(७) पोटकलम (४) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करून जर कोणती व्यक्ती अधिसूचित जागेत थांबून राहिली तर, तिच्याविरूद्ध करता येईल अशा अन्य कोणत्याही कार्यवाहीला बाध न येता, यासंबंधात केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकरवी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी तिला त्या जागेतून घालवता येईल.

(८) पोटकलम (१) अन्वये एखाद्या जागेच्या संबंधात काढलेल्या एखाद्या अधिसूचनेमुळे किंवा पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती अधिसूचनेच्या किंवा, प्रकरणपरत्वे, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ज्याच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक मर्यादांच्या आत अशी अधिसूचित जागा आहे त्या जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाकडे,—

(क) ती जागा बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वापरण्यात आलेली नाही असे घोषित करण्याकरिता ; किंवा

(ख) पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) अन्वये काढण्यात आलेला आदेश रद्द ठरवण्याकरिता,—

अर्ज करू शकेल आणि असा अर्ज आल्यानंतर जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर त्या प्रश्नासंबंधी निर्णय देईल.

या अधिनियमा-खालील अर्जाचा निकाल करताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

९. या अधिनियमाखाली करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कलम ४ च्या पोटकलम (३) अन्वये कोणतीही चौकशी करताना अधिकरणाने किंवा कलम ७ च्या पोटकलम (४) अन्वये किंवा कलम ८ च्या पोटकलम (८) अन्वये कोणत्याही अर्जाचा निकाल करताना जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाने अनुसरावयाची कार्यपद्धती ही, शक्य होईल तितकी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यामध्ये हक्क मागण्यांच्या अन्वेषणाकरिता घालून देण्यात आल्याप्रमाणे तीच कार्यपद्धती असेल आणि अधिकरण किंवा, प्रकरणपरत्वे जिल्हा न्यायाधीशांचे न्यायालय यांचा निर्णय अंतिम असेल. १९०८ चा ५.

## प्रकरण ३ रे

### अपराध आणि शिक्षा

बेकायदेशीर संघटनेचे सदस्य असल्याबद्दल शिक्षा.

१०. कलम ३ अन्वये काढण्यात आलेली जी अधिसूचना त्याच कलमाच्या पोटकलम (३) अन्वये परिणामक झालेली आहे, त्या अधिसूचनेद्वारे बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आलेल्या संघटनेचा जो कोणी सदस्य आहे व ज्याचे त्या संघटनेचे सदस्यत्व चालू राहिले आहे, अथवा जो अशा कोणत्याही बेकायदेशीर संघटनेच्या सभांमध्ये भाग घेईल अथवा अशा कोणत्याही बेकायदेशीर संघटनेच्या प्रयोजनार्थ वर्गणी देईल किंवा कोणतीही वर्गणी घेईल किंवा तो मागेल, अथवा अशा कोणत्याही बेकायदेशीर संघटनेच्या कामगिरीला सहाय्य करील तो, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र असेल, तसेच तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बेकायदेशीर संघटनेच्या निधीचा व्यवहार करण्याबद्दल शिक्षा.

११. जर कोणतीही व्यक्ती, कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये कोणतेही पैसे, रोखे किंवा पतरकमा यांच्यासंबंधात तिच्यावर बजावण्यात आलेल्या मनाई आदेशांचे उल्लंघन करून त्यांचे प्रदान करील किंवा त्यांची सुपूर्दगी करील, हस्तांतरण करील किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यासंबंधी व्यवहार करील तर, ती व्यक्ती तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावास, अथवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल, आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा उल्लंघनाबद्दल संपरीक्षा करणारे न्यायालय, दोषी ठरलेल्या व्यक्तीने ज्यांच्या संबंधात मनाई आदेशाचे उल्लंघन केले आहे ते पैसे, त्या पतरकमा किंवा त्या रोख्यांचे बाजारमूल्य किंवा न्यायालयाला योग्य वाटेल असा त्या रकमेचा भाग तिच्याकडून वसूल करण्याकरिता तिच्यावर जादा द्रव्यदंडही आकारू शकेल. १८९८ चा ५.

अधिसूचित जागेच्या संबंधात काढलेल्या आदेशाच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

१२. (१) जो कोणी कोणत्याही वस्तुच्या संबंधात कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करून त्या वस्तुचा वापर करील तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र असेल, तसेच तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

(२) जो कोणी कलम ८ च्या पोटकलम (४) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करून जाणूनबुजून व बुद्धिपुरस्सर एखाद्या अधिसूचित जागेत थांबेल, किंवा प्रवेश करील किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करील तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र असेल व तसेच तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

बेकायदेशी कृत्यांबद्दल शिक्षा.

१३. (१) जो कोणी कोणत्याही बेकायदेशीर कृत्यात—

(क) भाग घेईल किंवा असे कृत्य करील, किंवा

(ख) अशा कृत्याचा पुरस्कार करील, त्यास अपप्रेरणा देईल, त्या कामी सल्ला देईल, अथवा ते करण्यास चिथावणी देईल,

तो सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र असेल व तसेच तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

(२) कलम ३ खाली एखाद्या संघटनेस बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आले असून, ज्या अधिसूचनेद्वारे संघटना याप्रमाणे बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आली आहे ती अधिसूचना त्या कलमाच्या पोटकलम (३) खाली परिणामक झाल्यानंतर, जो कोणी अशा कोणत्याही संघटनेच्या कोणत्याही बेकायदेशीर कृत्याला कोणत्याही प्रकारे सहाय्य करील तो, पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, अथवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(३) भारत सरकार आणि अन्य कोणत्याही देशाचे सरकार यांच्यामध्ये झालेला कोणताही तह, करार किंवा अभिसंधी यांना किंवा त्यासाठी भारत सरकारने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या वाटाघाटींना या कलमाखाली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

अपराध दखलपात्र असणे.

१४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये दंडनीय असलेला अपराध हा दखलपात्र असेल. १८९८ चा ५.

## प्रकरण ४ थे

### संकीर्ण

१५. केवळ एखाद्या संघटनेचे विसर्जन करण्याच्या औपचारिक कृतीमुळे किंवा तिच्या नावात बदल करण्यामुळे तिचे अस्तित्व संपुष्टात आले आहे असे मानण्यात येणार नाही तर, जोपर्यंत त्या संघटनेच्या प्रयोजनार्थ प्रत्यक्षात एखादा संघात कार्य करीत आहे तोपर्यंत ती संघटना चालू आहे असे समजण्यात येईल. **संघटना चालू राहणे.**

१६. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल त्याच्याव्यतिरिक्त एरव्ही, केंद्र शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने किंवा केंद्र शासनाकडून किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये केलेली कोणतीही कार्यवाही कोणत्याही न्यायालयात कोणत्याही दाव्यामध्ये किंवा अर्जामध्ये किंवा अपिलाद्वारे किंवा पुनरीक्षणाद्वारे प्रश्नास्पद करता येणार नाही, आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीनुसार करण्यात आलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कारवाईच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाकडून किंवा अन्य प्राधिकरणाकडून कोणताही मनाईहुकूम दिला जाणार नाही. अधिकारितेस प्रतिबंध.

१७. केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासनाने यासंबधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज, कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली दंडनीय असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही. **या अधिनियमाखालील अपराधाबद्दल खटला.**

१८. (१) हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा काढण्यात आलेले आदेश यानुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे घडून आलेल्या किंवा घडण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल अथवा नुकसानीबद्दल केंद्र शासनाच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. **सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

(२) हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा काढण्यात आलेले आदेश यानुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा यासंबंधात शासनाने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

१९. केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, कलम ७ किंवा कलम ८ खाली किंवा या दोन्ही कलमाखाली त्याला ज्यांचा वापर करता येईल अशा सर्व शक्ती किंवा त्यापैकी काही शक्ती अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीमध्ये आणि त्याप्रमाणे विनिर्दिष्ट अशा काही शर्ती असल्यास त्यानुसार एखाद्या राज्य शासनानेही वापराव्यात आणि राज्य शासन केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेने लेखी आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, ज्या शक्तीचा वापर करण्यासंबंधी राज्य शासनाला सांगण्यात आले आहे अशी एखादी शक्ती त्या निदेशात राज्य शासनाचा जो कोणताही दुय्यम अधिकारी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याने, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीमध्ये आणि त्याप्रमाणे विनिर्दिष्ट अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यानुसार वापरावी. प्रत्यायोजनाची शक्ती.

२०. या अधिनियमाचे उपबंध किंवा त्यांखाली करण्यात आलेला कोणताही नियम किंवा काढण्यात आलेला कोणताही आदेश हे, त्यांच्याशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट हा अधिनियम खेरीजकरून अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामक असणाऱ्या संलेखामध्ये अंतर्भूत असली तरी, परिणामक होतील. **अन्य अधिनियमतीशी विसंगत असलेला अधिनियम आणि नियम, इत्यादींचा परिणाम.**

२१. (१) केंद्र शासन, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल. **नियमकरण्याची शक्ती.**

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येईल, त्या बाबी म्हणजे :—

(क) या अधिनियमाखाली काढण्यात आलेल्या नोटिसा आणि करण्यात आलेले आदेश बजावणे आणि ज्या बाबतीत, अशा प्रकारे नोटीस किंवा आदेश ज्या व्यक्तीवर बजावावयाचा आहे ती व्यक्ती म्हणजे एखादा निगम, कंपनी, बँक किंवा अन्य संघटना असेल त्याबाबतीत अशा नोटिसा किंवा आदेश कसे बजावावयाचे ती पद्धती ;

(ख) या अधिनियमाखाली कोणतीही चौकशी करताना किंवा कोणत्याही अर्जाचा निकाल करताना अधिकरणाने किंवा जिल्हा न्यायाधिशाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) केंद्र शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यनतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, [1][ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा त्याहून अधिक सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधिकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल; आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर], त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

१. "एका सत्राने" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "संपण्यापूर्वी जर", या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८५ (१९८६ चा ४) याद्वारे घातला (दिनांक १४ जानेवारी १९८६ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई